**तातडीचे / कालमर्यादित**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**सामान्य प्रशासन विभाग**
क्र.साप्रवि/२२/कावि/ ५८ /२०२५
दिनांक - ०७/०२ /२०२५

**प्रति,**

**सर्व विभाग प्रमुख / शाखा प्रमुख**
**................................विभाग**
पिंपरी चिंचवड महारनगरपालिका,
पिंपरी – ४११०१८.

**विषय – कार्यमुल्यांकन अहवाल त्वरीत सादर करणेबाबत.**
**संदर्भ – परिपत्रक क्र. साप्रवि/२२/कावि/२४०/२०२४, दिनांक - १३/०३/२०२४**

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील गट अ ते गट क अधिकारी / कर्मचारी यांचे प्रलंबित कार्यमुल्यांकन अहवाल सादर करणेबाबत यापूर्वी संदर्भिय परिपत्रकान्वये कळविणेत आले होते. परंतु, माझ्या असे निदर्शनास आले आहे की, अजुनही बरेच अधिकारी / कर्मचारी यांचे कार्यमुल्यांकन अहवाल येणे बाकी आहे. याबाबत संबंधित आस्थापना कर्मचारी, प्रतिवेदन व पुर्नविलोकन अधिकारी हे जाणीवपुर्वक सदरची बाब दुर्लक्षित करत असलेचे दिसून येते. त्याचप्रमाणे, महापालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे परिपूर्ण कार्यमुल्यांकन अहवाल तात्काळ सादर न केलेस व कार्यमुल्यांकन अहवाला-अभावी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे आर्थिक नुकसान, अगर कायदेशीर बाब निर्माण झालेस याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागातील विभागप्रमुखांची राहील. कार्यमुल्यांकन अहवाल विहित कालावधीत, प्रतिवेदन, पुर्नविलोकन न केल्यास त्याची (प्रतिकुल) नोंद संबंधितांच्या पुढील वर्षाच्या कार्यमुल्यांकन अहवालात घेतली जाईल.

सबब, ज्या अधिकारी / कर्मचारी यांचे प्रलंबित कार्यमुल्यांकन अहवाल अद्यापही सामान्य प्रशासन विभागास पाठविलेले नाहीत, अशा सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांनी त्यांच्या अधिनस्त संबंधित कर्मचारी यांनी प्रलंबित कालावधीचे कार्यमुल्यांकन अहवाल दिनांक १४/ ०२ /२०२५ अखेर सादर करावेत, संदर्भिय परिपत्रकान्वये मधील नमुद केलेल्या तरतुदीनुसार प्रतिवेदन / पुर्नविलोकन करून विहीत कालावधीत सादर करणे आवश्यक असलेने प्रकरणी, दिरंगाईबाबत शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रतिवेदन व पुर्नविलोकन अधिका-यांवर नियमाधीन कार्यवाही करणेत येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(विठ्ठल जोशी)
**उप आयुक्त, सा. प्र. वि.**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८